# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१**

Tel.-22665233 Fax.-22661239 Email-rdcmumbaicity@gmail.com

क्रमांक - रवका/टे-३/गणेशोत्सव/ध्वनीक्षेपक परवानगी/२०१७/ 482

दिनांक - 2 4 AUG 2017

**विषय : ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अंमलबजावणीबाबत.**

वाचा : १. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र.एसओ १२३(ई), दि.१४.०२.२०००
२. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र.एसओ १००८(ई), दि.११.१०.२००२
३. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र.१७३/२०१० दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेले आदेश / निकालपत्र
४. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची अधिसूचना क्र.का.आ.२५५५ (अ), दि.१०.०८.२०१७
५. शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१, दिनांक २२.०८.२०१७
६. पोलीस उपआयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांचे दिनांक २३.०८.२०१७ रोजीचे पत्र

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५ (२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी (रात्री १० वा. पासून सकाळी ६ वाजेपर्यंत) करता येत नाही. या नियमामध्ये दि.११.१०.२००२ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्र शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम (३) चा नव्याने समावेश करण्यात आलेला होता. त्याअन्वये ध्वनी प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक सणांकरिता करता येत होता. तसेच या अनुषंगाने जनहित याचिका क्र.१७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरासाठी राज्य शासनाने निश्चित केलेल्या वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्यात आली होती.

आता केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक दि.१०.०८.२०१७ रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ सुधारित अधिसूचना निर्गमित केलेली असून सदर अधिसूचनेन्वये नियम ३ मध्ये उपनियम (५) व नियम ५ मध्ये उपनियम (३) मध्ये सुधारणा केली आहे. आता नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर वर्षातील एकुण १५ दिवसांसाठी (श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत करण्याकरिता वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी राज्य शासनाव्दारे शासन, पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१, दिनांक २२.०८.२०१७ अन्वये संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

सन २०१७ या वर्षासाठी राज्य शासनाने दि.०५.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या १५ दिवसांपैकी आतापर्यंत ५ दिवसांची सूट उपयोगात आलेली असल्याने आगामी उत्सव कालावधी लक्षात घेता सन २०१७ साठी उरलेले १० दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबत (श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून

सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट जाहिर करण्याची बाब विचाराधीन होती. त्याअन्वये पोलीस उपआयुक्त (अभियान), पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय यांचे दिनांक २३.०८.२०१७ रोजींच्या पत्रान्वये मुंबई शहर जिल्हयात सन २०१७ साठी उरलेले १० दिवस खालीलप्रमाणे ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबत (श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट देणेत येत आहे.

- गणपती उत्सव : ४ दिवस (दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरी विर्सजन व अनंत चर्तुदशी)
- नवरात्री उत्सव : २ दिवस (अष्टमी व नवमी)
- दिवाळी : १ दिवस (लक्ष्मीपूजन)
- ख्रिसमस : १ दिवस
- ३१ डिसेंबर : १ दिवस
- उर्वरित १ दिवस : परवानगी पोलीस विभागाशी सलामसलत करुन महत्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार दिली जाईल.

वरीलप्रमाणे ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवाणी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट खालील अटींच्या अधिन राहून देणेत येत आहे.

१) मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी ध्वनी प्रदूषणासंबंधात दिलेल्या आदेशात नमूद बाबींचे तंतोतंत पालन करावे व मा. न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

२) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूट ही राज्य शासनामार्फत घोषित शांतता क्षेत्रात लागू होणार नाही.

३) ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक इत्यादींच्या वापराबाबतच्या उपरोक्त सूटीच्या कालावधीत ध्वनी प्रदूषण नियम २००० मधील नियम ३ व ४ चे पालन करण्यात यावे.

४) ध्वनी प्रदूषण नियम, २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर मा. उच्च न्यायालयाने दि.१६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पध्दतीने कार्यवाही करावी. तसेच प्राधिकरणाने निदर्शास आणून दिलेल्या बाबींवर प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम १९ (अ) नुसार कार्यवाही करावी.

५) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या अधिसूचनेत घालून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे व तरतूदींचे उल्लंघन होणार नाही व त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना ध्वनी प्राधिकरणाने कराव्यात.

24/08/17

(संपदा मेहता),
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत :

१. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२. पोलीस उपआयुक्त (अभियान), मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई
३. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रामकर चेंबर, २१६, ई-विंग, २ रा मजला,जैन मंदिराजवळ, देवनार गाव रोड, गोंवडी (पुर्व), मुंबई-४०० ०८८
४. जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी (NIC), मुंबई शहर यांना संकेतस्थळावर तात्काळ प्रसिध्दीसाठी